घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध आ.. स्वास्थ रहा
नवल
शुध्द तूप
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड, धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com


# आपला महाराष्ट्र


मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.No./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.१७५ ■ सोमवार ३० मार्च २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४



बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


## खरात प्रकरणात रुपाली चाकणकरांना समन्स
## गांभीर्य लक्षात घेत अटक करा : रोहिणी खडसे

**नाशिक/जळगाव, दि.२९- भोंदूबाबा अशोक खरात याच्या अघोरी कृत्यांचा आणि आर्थिक व्यवहारांचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने आपला मोर्चा खरातशी संबंधीत संस्थांकडे वळवला आहे. खरातच्या शिवनिका संस्थेचे सर्व व्यवहार आता एसआयटीच्या रडारवर आले आहेत. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनाही चौकशीसाठी समन्स बजावल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. शिवनिका संस्थेच्या सर्व आजी-माजी सदस्यांची चौकशी होणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. एसआयटी सर्व आजी-माजी सदस्यांना चौकशीसाठी बोलवणार असल्याची माहिती आहे. रूपाली चाकणकर यांची देखील एसआयटीकडून आता चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



अशोक खरातशी असणाऱ्या कथित संबंधांवरून रुपाली चाकणकरांना प्रथम राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद आणि त्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरून राजीनामा द्यावा लागला आहे. शिवसेना उद्धव बाळा साहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे व राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी या प्रकरणी नाशिकच्या पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेऊन रुपाली चाकणकर यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना सहआरोपी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकावरील दबाव वाढला होता. या वृत्तानुसार, भोंदू अशोक खरातच्या शिवनिका संस्थान, मिरगाव या ट्रस्टवर सदस्य असल्याप्रकरणी रुपाली चाकणकर यांना हे समन्स बजावण्यात आले आहेत. या प्रकरणी या ट्रस्टच्या सर्व आजी-माजी सदस्यांची चौकशी होणार असल्याची माहिती आहे.

**समन्स म्हणजे आभाळ कोसळले नाही : बावनकुळे**

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल **(पान ४ वर)**

### गॅस तुटवड्याचा महाराष्ट्रात पहिला मृत्यू

अकोला, दि.२९- गॅस सिलेंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे अकोला जिल्ह्यात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. गॅस टंचाईच्या टेन्शनमुळे अन्वी मिर्झापूर येथील वंचित बहुजन आघाडीचे माजी सरपंच शंकरराव शिरसाट यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. सकाळपासून गॅस मिळवण्यासाठी रांगेत उभे असताना त्यांना चक्कर आल्याने ते कोसळले आणि काही वेळातच त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आणि नियोजनाच्या पूर्ण अभावावर संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिरसाट यांना गॅस सिलेंडरसाठी ओटीपी मिळाला होता. मात्र ओटीपी मिळूनही **(पान ४ वर)**

## अमेरिका, युरोपीय देशांत नो किंग्स मोहीम
## हजारो नागरिकांची झेंडे उलटे धरत निदर्शने

**वॉशिंग्टन, दि.२९- इराणविरोधात युद्ध पुकारल्याने जगभरातील देशांना त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात रोष वाढत आहे. त्यांच्या विविध धोरणांविरोधात शनिवारपासून अमेरिका आणि युरोपमध्ये नो किंग्स रॅलींच्या माध्यमातून लाखो लोकांनी निदर्शने केली. या आंदोलनाचे मुख्य केंद्र मिनेसोटा होते. सेंट पॉल येथील मिनेसोटा कॅपिटलच्या मैदानावर आणि आसपासच्या रस्त्यांवर हजारो लोक खांद्याला खांदा लावून उभे होते. काहींनी अमेरिकेचे झेंडे उलटे धरले होते, जे ऐतिहासिकदृष्ट्या संकटाचे लक्षण मानले जाते.**




या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण प्रसिद्ध गायक ब्रूस स्प्रिंगस्टीन होते. त्यांनी स्ट्रीट्स ऑफ मिनीपोलिस हे गाणे सादर केले. फेडरल एजंट्सनी केलेल्या रेनी गुड आणि ॲलेक्स प्रेटी यांच्या हत्येच्या निषेधार्थ तसेच ट्रम्प प्रशासनाच्या इमिग्रेशन धोरणांविरुद्ध रस्त्यावर उतरलेल्या मिनेसोटावासीयांच्या सन्मानार्थ त्यांनी हे गाणे लिहिले होते. स्प्रिंगस्टीन म्हणाले, तुमच्या जिद्दीने हे सिद्ध केले आहे की, अजूनही ही अमेरिकाच आहे आणि हे भयानक स्वप्न फारवेळ टिकणार नाही.

**विदुषका, राजमुकुट खाली ठेव**

वॉशिंग्टन डीसीमध्ये शेकडो लोकांनी लिंकन मेमोरिअलसमोरून नॅशनल मॉलपर्यंत मोर्चा काढला. त्यांच्या हातात विदुषका, राजमुकुट खाली ठेव, असे लिहिलेले फलक होते. तसेच राजा नको अशा घोषणाही त्यांनी दिल्या.

**जागतिक प्रतिसाद**

न्यूयॉर्क शहरापासून ते आयडाहोमधील **(पान ४ वर)**

## नाशिक जिल्हा-कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम यशस्वी
## नाशिक पोलिस आयुक्तालयाने पटकविला प्रथम क्रमांक

**नाशिक, दि.२९- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या दिवसांच्या ई गव्हर्नन्स कार्यक्रमात पोलिस आयुक्तालय गटात नाशिक जिल्हा-कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम राबविणाऱ्या नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांचा गौरव करण्यात आला.**



यावेळी माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५० दिवसांचा कृती आराखड्याबाबत शासकीय कार्यालयांमध्ये ई प्रशासन सुधारणा आणण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १५० दिवसांचा ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई ऑफिस, कार्यालयाचा डॅश बोर्ड, व्हॉटस प, चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता **(पान ४ वर)**

### विजेचा लपंडाव सुरु लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

धुळे, दि.२९- शहरात ऐन उन्हाळ्यात महावितरण कंपनीकडून विजेचा लपंडाव सुरु झाला आहे. दिवसा आणि रात्री दोन-दोन तास वीज गायब होत आहे. लोकप्रतिनिधी मात्र यावर चुप्पी साधून असल्याने कंपनीचे चांगलेच फावले आहे. विशेषत: पेठ भागात वीज वारंवार खंडीत होत आहे. कंपनीच्या लालबाग कार्यालयात तक्रारीसाठी गेले असता तेथे कुणीही अधिकारी, कर्मचारी हजर राहत नाही. त्यामुळे नागरिकांनी दाद कुणाकडे मागावी? असा प्रश्न निर्माण झाला आहे. उन्हामुळे उकाडा वाढला आहे. वीज गेल्यानंतर त्यात भर पडते. व्यवसायांवरही विपरित परिणाम होत आहे. लोकप्रतिनिधी मात्र गप्प बसून आहेत.

## पेसा क्षेत्रातील आदिवासी शिक्षकांना तात्काळ न्याय द्या
## जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषणाचा संघटनेचा इशारा

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी) - पेसा क्षेत्रातील आदिवासी शिक्षकांना न्याय न दिल्यास जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा शिक्षकांकडून देण्यात आला आहे.**



राज्यपालांच्या पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील सरळ सेवेची पदे भरण्याबाबतची अधिसूचना निर्गमित केली त्यानुसार शासन निर्णय नुसार भरती सुरु करण्यात आली. पण सदर भरती प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयात असल्याने ५ ऑक्टोबरच्या शासन निर्णयानुसार नंदुरबार जिल्ह्यातील गुणवत्ता पात्रता यादीतील टेट-शिफारस पात्र उमेदवारांनी मानधन तत्वावर नियुक्त्या स्वीकारलेल्या आहे आणि अतिशय कठीण परिस्थितीत, नियमित मानधन दिले गेले नसताना या मानधन शिक्षकांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमच्या कायद्याचे पालन करून आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य केले आहे. तसेच न्यायालयाने सदर भरती प्रक्रिया करण्याचे आदेश दिले आहे. त्यानुसार ११ फेब्रुवारी २०२६ शासन निर्णय निर्गमित केला गेला आहे त्या निर्णयाप्रमाणे पालघर, ठाणे, **(पान ४ वर)**

### उपजिल्हा रुग्णालयात रुग्णवाहिका पेटली

शिरपूर दि.२९ (का.प्र.) : शहरातील उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात पार्क केलेली १०८ सेवेची रुग्णवाहिका अचानक आग लागल्याने जळून खाक झाली. ही घटना २९ मार्चला पहाटे घडली. शासनाने आपत्कालीन रुग्णवाहतुकीच्या हेतूने १०८ सेवा सुरु केली असून त्याअंतर्गत तालुक्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यापैकी रुग्णवाहिका (एमएच १४, सीएल ०७२९) उभी असतांना पहाटे तिला अचानक आग लागली. काही वेळातच आग भडकली. ही बाब कळताच शिरपूर नगर परिषदेच्या अग्निशामक दलाने घटनास्थळी पोहचून आग नियंत्रणात आणली. मात्र तोपर्यंत रुग्णवाहिका खाक झाली होती.



## वीज तारांच्या शॉर्टसर्किटमुळे आग
## तऱ्हाडीत दोन एकर मका खाक

**तऱ्हाडी, दि.२९ (प्रतिनिधी) - येथील शिवारातील शेतकरी श्याम रमेश कदम यांच्या शेतातून जाणाऱ्या विद्युत तारांमध्ये तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने भर दुपारी शॉर्टसर्किटमुळे दोन एकर क्षेत्रावरील मका पीक जळून खाक झाला आहे. या घटनेमुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, श्याम कदम यांच्या शेतात मक्याचे पीक काढणीला आले होते. मात्र, शेतावरून गेलेल्या महावितरणच्या तारांमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला. या तारांमधून ठिणग्या पडून खाली असलेल्या वाळलेल्या व काढणीला आलेल्या पिकाने त्वरित पेट घेतला. वाऱ्याचा वेग जास्त असल्याने काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण दोन एकर मका आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. मका पीक शेतात चांगल्या प्रकारे तयार झाले असल्याने यंदा चांगले उत्पन्न मिळेल अशी आशा कदम यांना होती. मात्र, महावितरणच्या जुन्या झालेल्या तारांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळे हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. रात्रंदिवस मेहनत करून पीक वाढवले, पण एका झटक्यात सर्वकाही संपले, अशी भावना कदम यांनी व्यक्त केली आहे.

या घटनेची माहिती मिळताच परिसरातील **(पान ४ वर)**

## लळींग कुरणाच्या पाणवठ्यांमध्ये पाणी; व्याकुळ वन्यजीवांना दिलासा

**धुळे, दि.२९- जिल्ह्यात तापमानाचा पारा चाळीस अंशावर गेलेला असताना बाष्पीभवनाचा वेग वाढला आहे. परिणामी, कोरड्या पडलेल्या कृत्रिम पाणवण्यांची स्वच्छता करीत वन विभागाने पाणी उपलब्ध करून दिले. त्यामुळे लळींग कुरणातील असणाऱ्या वन्य प्राण्यांना तहान भागविणे शक्य झाले आहे. कोरडे पाणवठे आणि व्याकुळ होणारे वन्यजीव याबाबत आपला महाराष्ट्र मध्ये वृत्त प्रसिध्द झाले होते. त्याची दखल वन विभागाने घेतली आणि पाणवठ्यांमध्ये पाणी उपलब्ध करून दिले. वन विभागाच्या या कामामुळे वन्यजीव प्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे.**



आपला महाराष्ट्र इफेक्ट

धुळेशहरासह जिल्ह्याच्या तापमानाचा पारा सध्या चाळीस अंशापर्यंत गेला आहे. उन्हाची तीव्रता पहाता दिवसागणिक तापमानात वाढ होणार आहे. त्याचवेळी हवामान कोरडे होत आहे. त्यामुळे सर्वांनाच कोरड पडत आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे धुळे शहराच्या दक्षिणेस असलेल्या लळींग कुरणातील ओढे आणि ओघळी कधीच कोरडे झाले. ओढ्यांच्या खोलगट भागात काही प्रमाणात पाणी आहे. पण, त्या भागात हिंस्त्र प्राण्यांचा वावर असल्याने अन्य वन्यजीव आणि पक्षी तेथे तहान भागविण्याचे धाडस करीत नाही. धुळे जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ सात हजार १९५ चौरस किलोमीटर आहे. त्यापैकी एक हजार १८ चौरस किलोमीटर वन क्षेत्र आहे. धुळे शहराच्या दक्षिणेस लळींग कुरण संरक्षित करण्यात आले आहे. त्यात बिबटे, ससे, हरीण, गवे, रानडुक्कर, साळींदर असे वन्यजीव वाढीस लागले आहेत. पण, सध्या पाण्याचे स्त्रोत कोरडे पडले आहे. अशीच परिस्थिती काही वर्षापुर्वी निर्माण झाली होती. त्यावेळी **(पान ४ वर)**



## शिंदखेड्यात पत्रकारांवर दबावाचा प्रयत्न
## चौकशीसाठी प्रशासनाला दिले निवेदन

**शिंदखेडा, दि.२९ (प्रतिनिधी)- शहरात पत्रकारांची मुस्कटदाबी करून दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात शासन व पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून ते सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक ढोके यांनी स्वीकारले.**

नाशिक येथील तथाकथित भोंदू बाबा अशोक खरात यांच्याबाबत बातमी प्रसारित केल्यानंतर लोकवृत मराठी चॅनलच्या प्रमुखाला भाजपाशी संबंधित गोविंद प्रकाश मराठे (उर्फ दादा मराठे) यांनी धमकी देत सोशल मीडियावर माफी मागण्यास भाग पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणात धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या नावाचा गैरवापर होत असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. पत्रकाराने दिलगिरी व्यक्त करूनही त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी होत असल्याने पत्रकारांवर दबाव टाकून बातम्या रोखण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, ३० मार्च रोजी राज्यभर आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून, यावेळी मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

## वालंबा खूनप्रकरणी दोघे अटकेत
## नंदुरबार एलसीबीची कामगिरी

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी) - त्रासाला कंटाळून डोक्यावर हत्याराने वार करीत एकाचा खून केल्याप्रकरणी दोन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. सतोना शिवारात मृतावस्थेत मिळून आलेल्या व्यक्तीच्या खूनाचा उलगडा झाला आहे. ही कामगिरी नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.**

तळोदा तालुक्यातील सतोना गावाच्या शेत शिवारात दि.२६मार्च २०२६ रोजी कांतीलालभाई वळवी (वय ५४, रा.वालंबा, ता.कुकरमुंडा) हे मयत अवस्थेत मिळून आले होते. वैद्यकिय अधिकाऱ्यांकडून मयताचे शवविच्छेदन झाले असता कोणी तरी अज्ञात इसमाने हत्याराने मयताच्या डोक्यावर गंभीर दुखापत करुन दोरीने गळा दाबल्याने मृत्यू झाल्याचे कारण अहवालात स्पष्ट झाले. याप्रकरणी तळोदा पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिस अधिक्षक श्रवण दत्त एस यांच्या मार्गदर्शनाखाली नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांनी पथक तयार करुन तपासाला गती दिली. या पथकाने माहिती मिळवित उपलब्ध पुरावे व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या माहितीच्या आधारे मयत अवस्थेत मिळून आलेल्या व्यक्तीचा खूनाचा उलगडा झाला आहे. कांतीलाल दशरथ पाडवी (वय ५०, रा. शेलवाई, ता.तळोदा), मोगराबाई अजीत वळवी (वय ४०, रा.अमोदा, ता. कुकरमुंडा) या दोघांनी मिळून **(पान ४ वर)**

### विहिरीत बुडाल्याने पो.पाटलाचा मृत्यू

धुळे, दि.२९- तालुक्यातील दिवाणमळा शिवारात नाल्यातील विहिरीच्या पाण्यात बुडाल्याने एकतीस वर्षीय पोलीस पाटलाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, दिवाणमळा गावचे पोलीस पाटील मिथून गोविंद नगापूरे (३५) हे दिवाणमळा शिवारातील एम.आय.डी.सी.मधील इंडोअमायन्स केमिकल कंपनीच्या पाठीमागील बाजुस नाल्यातील विहिरीच्या पाण्यात बुडालेल्या अवस्थेत आढळून आले. विहिरीच्या बाहेर काढले असता कुजलेल्या स्थितीत असल्याने ओळख पटविता आली नाही. हिरे मेडिकल कॉलेज येथे दाखल केले असता डॉ.शेख यांनी तपासून मयत घोषित केले.

## शिवसेनेच्या माध्यमातून शहादा परिसरातील रुग्णांसाठी
## हक्काची रुग्णवाहिका; आ.रघुवंशींच्या हस्ते लोकार्पण

**शहादा, दि.२९ (का.प्र.) - शहादा शहर व परिसरातील सर्वसामान्य आणि आदिवासी समाजाच्या रुग्णांना आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका मिळवण्यासाठी होणारी ओढाताण आता थांबणार आहे. शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी शिवसैनिकांना दिलेल्या शब्दाची पूर्तता करत, शहादा तालुका व शहरासाठी अद्ययावत रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे.**



नंदुरबार येथे आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते ही रुग्णवाहिका शहादा येथील शिवसेना पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली.आमदार चंद्रकांत रघुवंशी यांची विधानपरिषदेवर निवड झाल्यानंतर, शहादा येथील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी त्यांच्याकडे या भागातील रुग्णांसाठी कायमस्वरूपी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, या सामाजिक भावनेतून आ. रघुवंशी यांनी तातडीने रुग्णवाहिका देण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता झाल्याने शहादा परिसरात आनंदाचे वातावरण आहे.रुग्णवाहिका लोकार्पण प्रसंगी आमदार रघुवंशी यांच्यासह नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष वकील आबा पाटील, हस्ती बँकेचे अध्यक्ष ईश्वर जैन, बांधकाम सभापती देवेंद्र जैन, **(पान ४ वर)**

### दुचाकी अपघातात पत्नी ठार, पती गंभीर

धुळे, दि.२९-शिरपूर तालुक्यातील सांगवी गावाचे शिवारात लालमाती फाटा येथे पुढे चालणाऱ्या दुचाकीला मागुन भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात पुढे **(पान ४ वर)**


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,900 रु.+3% GST
सोने- 24 K -1,44,000 रु.+3% GST
चांदी- 2,32,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३





जांभुळ ज्युस मिळेल
नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६


## तापदायक ऊन्हाची तमा न बाळगता भाविकांचे जथ्ये
## देवीचा जयघोष करीत वणीच्या गडाकडे झाले रवाना

**धुळे, दि.२९- महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी अर्धशक्तीपीठ म्हणून मान्यता असलेल्या वणीच्या गडावरील सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनाची आस घेऊन हजारो भाविक पायी निघाले आहेत. कडाक्याच्या उन्हाची तमा न बाळगता अबालवृद्ध भाविकांचे जथ्ये देवीचा जयघोष करीत वणीच्या गडाकडे निघाले आहेत. त्यामुळे मुंबई-आग्रा महामार्गावरून पायी जाणाऱ्या आणि देवीचा जयधोष करणाऱ्या भाविकांमुळे धुळ्यात भक्तीमय वातावरणाची निर्मिती झाली आहे. देवीच्या दर्शनासाठी जाऊ शकत नसणाऱ्यांनी मार्गावर भाविकांसाठी अल्पोपहार, भोजन, फळे आणि फळांचा रस देऊन पुण्यकर्म करण्याचा मार्ग अवलंबला आहे.**



नाशिक जिल्ह्यातील वणी येथील गडावर सप्तश्रृंगी देवीचे मंदिर आहे. या मंदिराला अर्ध शक्तीपीठ म्हणून मान्यता आहे. त्यामुळे चैत्र पौर्णिमेस देवीचे दर्शन घेण्यासाठी अनेक भाविक जातात. अनेक जण मनोकामना पूर्ण झाली म्हणून तर अनेक जण मनोकामना पूर्ण **(पान ४ वर)**

### शिरपुरात आज विराट हिंदू संमेलन

शिरपूर, दि.२९ (का.प्र.)- शहरातील पाच कंदील चौकात ३० मार्चला सायंकाळी पाचला विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त हा उपक्रम राबवला जात असल्याची माहिती संयोजकांनी दिली. तालुक्यात अशा पद्धतीची १५ संमेलने होणार आहेत. ३० मार्चला होणाऱ्या संमेलनात गुजराथ व फैजपूर येथील सतपंथ आश्रमाचे महामंडलेश्वर जनार्दन हरी गुरु जगन्नाथ महाराज उपस्थित राहणार आहेत. रा.स्व.संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यकारणी सदस्य निलेश गद्रे मार्गदर्शन करणार आहेत. उपस्थितीचे आवाहन हिंदू संमेलन समितीने केले आहे.


दुकान बंद सूचना
दि.३१/०३/२०२६ रोजी अकौन्टींग इयर एंडींग (Accounting year ending) साठी दुकान बंद राहिल.
मे.गंगाधर बाळाशेठ नाशिककर सराफ
आग्रारोड, धुळे

# व्हॉलंटरी महिला मंडळ शाळेत वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात



शहादा, दि.२९ (का.प्र.)- महिला मंडळ संस्थेच्या व्हॉलंटरी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला. वर्षभरात शैक्षणिक, क्रीडा आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये दैदिप्यमान यश संपादन करणाऱ्या इयत्ता पहिली ते बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचा प्रारंभ माता सरस्वतीचे पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या चेअरमन हेमलताबेन शहा होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून शहाद्याचे गटविकास अधिकारी महेश पोतदार, विस्तार अधिकारी संजय बागले, संस्थेचे सचिव अ‍ॅड. राजेश कुलकर्णी उपस्थित होते. व्यासपीठावर शकुंतला पाटील, अ‍ॅड. स्मिता जैन, प्रविणा कुलकर्णी, ताराबाई बेलदार, डॉ.सायली वैद्य, मुख्याध्यापिका प्रतिभा बोरसे, प्राचार्य नयना पाटील, विद्या बोरसे, सुनीता सोनवणे, पदमा पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. शालेय व शाळाबाह्य विविध परीक्षा तसेच क्रीडा स्पर्धांत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू, सन्मानपत्र आणि पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी महेश पोतदार म्हणाले की, विद्यार्थी हेच देशाचे भावी आधारस्तंभ आहेत. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय गाठण्यासाठी जिद्द आणि चिकाटीने प्रयत्न केले पाहिजेत. यश मिळेपर्यंत थांबून नका; अपार मेहनत आणि परिश्रमातूनच तुम्ही शाळेचे व देशाचे नाव उज्वल करू शकता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका प्रतिभा बोरसे व प्राचार्य नयना पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन अर्चना पवार आणि डॉ. मोहिनी भवरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गायत्री सोलंकी यांनी मानले. सोहळा यशस्वी करण्यासाठी सुनिता पाटील, विजया पाटील, ललिता राठोड, नम्रता पाटील, अनिता पाटील, मीना ठाकूर, कौशल्या चौरे, नयना पाटील, पुष्पा पाटील, मनिषा पाटील यांच्यासह सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी मोलाचे सहकार्य केले.

# ब्राह्मणपुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर
## शेकडो लाभार्थ्यांनी घेतला शासकीय योजनांचा लाभ



**शहादा, दि.२९ (का.प्र.) - शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान टप्पा- अंतर्गत ब्राह्मणपुरी मंडळ कार्यालयात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून महसूल, कृषी, आरोग्य आणि पुरवठा विभागाच्या योजनांची माहिती देऊन लाभार्थ्यांना जागेवरच मार्गदर्शन करण्यात आले.**

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नायब तहसीलदार शैलेंद्र गवते यांनी भूषविले, तर मंडळ अधिकारी मधुकर सूर्यवंशी यांनी शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले होते. संपूर्ण अभियानाची जबाबदारी आणि सर्व विभागांच्या स्टॉल्सचे समन्वय महसूल नायब तहसीलदार शिरीषचंद्र परदेशी यांनी समर्थपणे सांभाळली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.शिबिरात विविध विभागांच्या वतीने स्टॉल्स लावून नागरिकांना सखोल माहिती देण्यात आली. कृषी विभागातील श्री. पाटोळे यांनी शेतकऱ्यांना पीक विमा, सिंचन सुविधा आणि अनुदानाच्या योजनांची माहिती देऊन आधुनिक शेतीकडे वळण्याचे आवाहन केले.

आरोग्य विभागामार्फत डॉ. प्रकाश पावरा यांनी जिल्ह्यातील वाढत्या क्षयरोगाच्या (टीबी) पार्श्वभूमीवर लक्षणे आणि सरकारी मोफत उपचारांबाबत मार्गदर्शन केले.पुरवठा विभागाचे श्री. दिलीप पाडवी व कुमारी कीर्ती बेंडकुळे यांनी रेशन कार्ड संगणकीकृत करणे, नाव कमी-जास्त करणे आणि नवीन कार्ड काढण्याची प्रक्रिया 'स्टेप-बाय-स्टेप' समजावून सांगितली.महसूल विभागातील ग्राम महसूल अधिकारी श्री. लक्ष्मण कोळी यांनी सातबारा उतारा, उत्पन्न दाखला आणि रहिवासी प्रमाणपत्राबाबत असलेल्या नवीन नियमांची माहिती दिली. तसेच लाडकी बहीण योजनेच्या पात्रता व अर्जाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.या शिबिरात मंडळातील सर्व गावांमधील सरपंच, उपसरपंच आणि शेकडो लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्राम महसूल अधिकारी श्रीमती सुरेखा राठोड यांनी प्रास्ताविकातून शिबिराचा उद्देश स्पष्ट केला, तर श्रीमती स्वप्नाली पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी महेश ठाकरे, दिलीप पावरा, मंगलदास राऊत, कृपेश गावित, भारत नेवरे आणि प्रकाश ठाकरे यांनी अथक परिश्रम घेतले. महसूल विभागातील या शिबिरामुळे अनेक प्रलंबित कामांना गती मिळाली असून नागरिकांनी प्रशासनाच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे. शेवटी श्री. लक्ष्मण कोळी यांनी सर्वांचे आभार मानले.

# युद्धजन्य परिस्थिती आणि कोरोनाचे भय

**(पान २ वरुन) इकडे सुविधांचे काहीही होवो. कोण तमा बाळगतो ? त्यांना आता कमाई करण्यासाठी रान मोकळे झाले आहे.छोट्याशा नगरपरिषदेची निवडणूक देखील हातची जाऊ नये म्हणून दिल्लीतून नियोजन झाले.वार्डातील उमेदवारांसाठी चार लाख आले.दोनच त्या उमेदवारा पर्यंत पोहचले. बाकी मध्येच गायब झाले. उमेदवाराने त्यातील एक लाख फिक्स डिपॉझिट मध्ये ठेवले.मद्याचे खोटे आले. त्यातील अर्धे वाटले अर्धे घरी नेले आणि विकले. चहा मंडप,साऊंड सिस्टीम ची व्यवस्था देखील पक्षानेच केली होती.एवढे सगळे विनासायास मिळाल्यावर तथाकथित कार्यकर्ता आणि लोक खुंट्या वर तर बांधलेली जाणार हे ठरलेले आहे. अशा प्रकारे सगळी व्यवस्था आणि आम जनतेची नीतिमत्ता वाढवून ठेवण्यात आल्याने सगळे काही मुकाटपणे सोसणे आणि स्वीकारण्याचे काम सुरू आहे. अशी स्थिती हिटलरच्या काळात जर्मनीत होती.लोकांना संमोहित करण्यात आले होते.आपणही त्याच दिशेने निघालो आहोत.**


## NAME CHANGE

I Have Change My Name From
**REHANA BANO AHEMAD KHAN PATHAN**
To New Name
**SHAIKH REHANA SHAHID**
Add:- 122 Muslim Nagar
Near Munshi Masjid
Dhule -424001
Maharashtra

## CHANGE NAME

My Old Name Was:-
**AFROZ BANU HAMID ALI**
My New Name Is:-
**AFROZA BI MOHAMMAD JAVID**
Add:- Plot No. 78,
Wadjai Road, Dhangar
D P, Millat Nagar
Dhule -424001

## टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व हितसंबंधी व वित्तीय संस्था यांना या जाहीर नोटीसीने आमचे पक्षकार यांचे तर्फे अ‍ॅड. बाळासाहेब अमुलराव पवार रा. धुळे यांचे मार्फत कळविण्यात येते की,

मौजे तळोदे ता. तळोदे जि. नंदुरबार येथील जुना सर्व्हे नं. २७/२ नवा सर्व्हे नं. ३४/२ पैकी प्लॉट नं. १७ क्षेत्र ९७.०५ चौ. मी. व प्लॉट नं. १८ क्षेत्र ९० चौ. मी. यास चतुसिमा मंजूर नकाशा प्रमाणे वर नमूद ही सौ. सुनिता विलास डामरे यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे उपभोगातील आहे. सदर मिळकतीचे पूर्वीचे मालक श्री. हकलाल उर्फ हरकलाल संपत माळी (सुर्यवंशी) व सौ. सुनिता विलास डामरे यांचेत झालेल्या मिळकतीचे मुळ खरेदीखत दस्त नं. १७३८/२००२ दि. १३/०५/२००२ दु. नि. नंदुरबार यांचेकडे नोंदणी झालेले खरेदीखत हे गहाळ झालेले असल्याबाबत सौ. सुनिता विलास डामरे यांनी तळोदा पो.स्टे. ला वर नमूद खरेदीखत गहाळ झालेबाबत ऑनलाईन तक्रार दि. ११/०३/२०२६ रोजी तक्रार क्र. १९८४४०७७०७२६००१०५ वर खरेदीखत शोधुन मिळणेस विनंती केली आहे. व तक्रारदार यांनी वैयक्तीक शोध घेतला असता अद्याप ते ख. खत मिळून आलेले नाही, असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

तसेच सदर मिळकतीवर श्रीमती सुनिता विलास डामरे ह्या श्रीराम फायनान्स लि. शाखा शहादा यांचे कडून कर्ज घेत असून त्यांचे लाभात रजिष्टर गहाणखत नोंदवून देणार आहेत.

सबब उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, बोजा, गहाण, भाडेपट्टा, टांच, जप्ती, खरेदी-विक्रीकरार, सौदापावती, हस्तांतरण, हिस्सा, अधिकार, बक्षिस, वारस हक्क, कोर्ट केसेस, हितसंबंध असल्यास व नियोजित व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचेकडे भेटून लेखी मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे वर बंधनकारक राहणार नाही. मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची व कोणचाही हितसंबंध नाही असे गृहीत धरून खरेदी करतील. परस्पर वर्तमान पत्राद्वारे घेतलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व कागदपत्र, अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.धुळे दि. २९/०३/२०२६

**अ‍ॅड.बाळासाहेब अमुलराव पवार**
अ‍ॅडव्होकट अ‍ॅण्ड नोटरी (भारत सरकार)
ऑफिस : अप्पर ग्राऊंड फ्लोअर, गाळा नं. ५, फॉरच्युन प्लाझा, गणपती रोड, जैन मंदिराच्या शेजारी, शिवतिर्थ व संतोषीमाता चौक जवळ, धुळे
मो.नं.९४२३२३२९०४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे बोरकुंड ता. जि. धुळे येथील गट नं. ६२९ चे एकूण क्षेत्र ला. ला. ४ हे. ३५ आर. +पो. ख. ० हे. २९ आर. असा एकूण ४ हे. ६४ आर. आकार ६ रु. ६० पै. विहिर (श्री. वसंत भटा पाटील यांचे मालकीचे क्षेत्र ला. ला. २ हे. १८ आर.+पो. ख. ० हे. १४ आर. एकूण २हे. ३२ आर आकार ३ रु. ३१ पै. व श्री. राजेंद्र भटा पाटील यांचे मालकीचे क्षेत्र ला. ला. २ हे. १७ आर. +पो. ख. ० हे. १५ आर. एकूण २ हे. ३२ आर आकार ३ रु. ३१ पै.) बागायत शेतजमीन वापर व रस्ता वहिवाटीप्रमाणे भोगवटा वर्ग १.

यासी चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे.

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **वसंत भटा पाटील, व श्री. राजेंद्र भटा पाटील** रा. बोरकुंड ता. जि. धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात जमीनीच्या वापरासाठी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. कडून हक्क संपादन, मुंबई मनमाड पाईप लाईन विस्तार परि योजना भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन साठी क्षेत्र ०.१७.१० हे.आर. मीटर क्षेत्राचे. अशी नोंद असून सदर संपादनाचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्राची खरेदी करण्याचे ठरले आहे. खरेदीसाठी लागणाऱ्या सर्व प्रकारचे कागदपत्रांची तसेच परवानग्यांची पूर्तता मिळकत मालक करणार आहेत.

तसेच ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात बँक ऑफ बडौदा शाखा बोरकुंडचा रक्कम रु. २,६६,०००/- चा पिककर्जचे बोजाची नोंद आहे. सदर बोजा खरेदीपूर्वी कमी करण्याची जबाबदारी मिळकत मालक यांची आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत इतर कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्चवरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही,तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. २९/०३/२०२६

**अ‍ॅड. रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.
मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस

शिरपूर तालुक्यातील त्यातही थाळनेर परिसरातील तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने अनिल कांतीलाल कृष्णदास पाटील (वाणी) यांचे कडून कळविणेत येते की, मौजे थाळनेर ता. शिरपूर शिवारातील शेतजमीनी.

| गट नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे | रेकॉर्डला नावे |
|---|---|---|---|
| ७०३ | ०३-७२ | २७-८५ | अतुल रामदास वाणी वगैरे |
| १०२४ | ००-९३ | ०९-७५ | अतुल रामदास वाणी वगैरे |

वरील वर्णनाच्या शेतजमीनी ह्या या नोटीसतील शेतजमीन असून सोयीसाठी सदर शेतजमीनीचा उल्लेख यापुढे या जाहीर नोटीसीत जाहीर नोटीसीतील शेतजमीन असा करणेत येईल.

जाहीर नोटीसीतील शेतजमीनी ह्या जरी आज रोजी रेकॉर्डला अतुल रामदास वाणी वगैरे यांचे नावे असल्या तरी सदर शेतजमीनीचा प्रत्यक्ष कब्जा सदर जाहीर नोटीस देणार अनिल कांतीलाल/कृष्णदास पाटील (वाणी) यांचा आहे. सदर शेतजमीनीविषयी नोटीस देणार अनिल कांतीलाल/कृष्णदास पाटील (वाणी) यांनी अमोल रामदास पाटील (वाणी) व अतुल रामदास पाटील (वाणी) यांचे विरुद्ध शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे न्यायालयात कायमचे मनाई हुकूमासाठी दि. १८/०७/२०१२ रोजी दावा दाखल केला होता. सदर दाव्यास रे. मु. नं. १२४/२०१२ असा क्रमांक लागला होता.

सदर दाव्यात दुतर्फा चौकशी अंती शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांनी दि. १७/१२/२०२५ रोजी निकाल पारीत केला असून नोटीस देणार अनिल कांतीलाल/कृष्णदास पाटील (वाणी) यांचा दावा रद्द केला आहे.

रे. मु. नं. १२४/२०१२ चे कामी झालेल्या न्यायनिर्णया विरुद्ध नोटीस देणार अनिल कांतीलाल/कृष्णदास पाटील (वाणी) यांनी धुळे येथील मे. सिव्हील न्यायाधीश सो. यांचेकडे अपिल दाखल केले असून त्यास नियमित दि अपिल नं. ९/२०२६ असा लागला आहे. सदर अपिलाची माहिती अमोल रामदास पाटील व अतुल रामदास वाणी यांना आहे.

सदरील नियमित दि. अपिल नं. ९/२०२६ चे कामी रे.मु.नं. १२४/२०१२ मधील निकालाचे अंमलबजावणीस स्थगिती मागणारा अर्ज नोटीस देणार अनिल कांतीलाल /कृष्णदास पाटील (वाणी) यांनी दिला असून मुळ अपिल व स्थगिती अर्ज धुळे येथील मे. तदर्थ जिल्हा न्यायाधीश नं. १ सो. (मा. गायकवाड सो.) यांचेकडे प्रलंबित आहे व अपिलाचे कामी पुढील ता. ०५/०५/२०२६ ठेवणेत आली आहे.

जरी नोटीसीतील शेतजमीन रेकॉर्डला अतुल रामदास वाणी वगैरे या नावे असली तरी सदर शेतजमीनीचा कब्जा नोटीस देणार अनिल कांतीलाल/कृष्णदास पाटील (वाणी) यांचा म्हणजे माझाच आहे. आजही सदर शेतजमीनींवर मी पेरणी केलेले पीक उभे आहे. वरील अतुल रामदास वाणी व अमोल रामदास वाणी हे थाळनेर येथे राहत देखील नाहीत.

असे असतांनाही केवळ जाहीर नोटीसीतील मिळकतींच्या रेकॉर्डला त्यांचे नावे नोंद असल्याचा गैरफायदा घेवून, वरील अमोल व अतुल रामदास वाणी हे सदर शेतजमीनीविषयी, परस्पर व्यवहार करुन हस्तांतरीत करण्याच्या तयारीत असल्याचे मला समजले आहे. त्यासाठी विविध मध्यस्थ (दलाल/ब्रोकर)हे प्रयत्नशील आहेत.

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस व थाळनेर भागातील लोकांना शेतजमीनीचा व्यवहार करणाऱ्या मध्यस्थांना (दलाल/ब्रोकर) यांना कळविणेत येते की, वरील वर्णन केलेल्या शेतजमीनी ह्या आजही माझे म्हणजे नोटीस देणार अनिल कातीलाल/कृष्णदास पाटील (वाणी) यांचे ताब्यात आहेत. या प्रकारे याशेतजमीनीविषयी व्यवहारकरण्याचा अमोल व अतुल रामदास वाणी यांना काही एक अधिकार व कायदेशीर हक्क नाही. त्याही उपर या शेतजमीनीचे बाबत मला अंधारात ठेवून त्यांनी काहीही परस्पर व्यवहार केल्यास तो व्यवहार माझेवर बंधनकारक राहणार नाही.

शिवाय या प्रकारे जाहीर नोटीसीतील शेतजमीनीचे बाबत मी मे. धुळे जिल्हा न्यायालयात केलेले नियमित दि. अपिल नं. ९/२०२६ हे प्रलंबित असतांना केलेला कोणताही व्यवहार हा लिस पेन्डेन्स सदरात येतो व तो माझेवर बंधनकारक राहणार नाही.

**तरी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,**

मौजे थाळनेर ता. शिरपूर येथील शेतजमीनी गट नं. ७०३ व १०२४ यांचेबाबत अतुल रामदास वाणी वगैरे यांचेशी कोणीही खरेदी,सौदा पावती अगर हस्तांतरणाचा व्यवहार करु नये.

त्याही उपर या प्रकारे माझ्या संमतीविना कोणी परस्पर व्यवहार केल्यास तो या शेतजमीनीत असणाऱ्या माझ्या हक्कांवर बंधकारक राहणार नाही. तसेच सदरचा प्रकार हा लिस पेन्डंन्सच्या तरतुदी प्रमाणे बेकायदेशीर ठरले. तसेच दोन्ही शेतजमीनी आजही माझे कब्जात असून या शेतजमीनीचे बाबत मे. जिल्हा न्यायालयात वरील प्रमाणे वाद प्रलंबित आहे, याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली असे. धुळे दि. १७/०३/२०२६
नोटीस देणार : **अनिल कांतीलाल/कृष्णदास पाटील (वाणी)**
सदरची जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत दिली .

**अ‍ॅड. प्रल्हाद अेंडाईत**
अहिल्या नगर, वरचे गांव शिरपूर जि. धुळे - ४२५४०५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व वित्तीय कंपन्या, बँका, पतसंस्था, इत्यादी यांना आमचे अशिल श्री. बाजीराव दशरथ पाटील (भामरे) रा. पिरबाबा दरगाह जवळ मेहेरगांव, ता. जि. धुळे यांचेतर्फे सदर जाहीर नोटीसीने सुचित करण्यात येते की,

मौजे नवलाने ता. जि. धुळे येथील मुळ शेतजमीन गट नं. ५ ज्यांचे क्षेत्र ला. ला. ३ हे. ४१ आर. व पो. ख. ० हे. ३७ आर एकूण ३ हे. ७८ आर कै. दशरथ दगा पाटील यांच्या मालकीचा होता. दशरथ दगा पाटील यांचे मृत्यूनंतर सदर शेतजमीनीच्या रेकॉर्ड ऑफ राईटला सन १९८३ मध्ये त्यांची दोघी मुले नामे बाजीराव दशयथ पाटील, व किसन दशरथ पाटील यांची नावे वारसाहक्काने लागली व दोन्ही भाऊ सदर शेतजमीनीचे वारसाहक्काने सामाईक मालक झालेत. त्यानंतर बाजीराव दशरथ पाटील व किसन दशरथ पाटील यांनी सन १९९४ मध्ये सदर शेतजमीनीची आपसात समजुतीने विभागणी ठरविली व त्यानुसार गट नं. ५ चे दोन पोटभाग गट नं. ५/१ व गट नं. ५/२ म्हणजेच ५/अ व ५/ब झालेत. पोटहिस्सा गट नं. ५/१ बाजीराव दशरथ पाटील यांच्या आणि गट नं. ५/२ किसन दशरथ पाटील यांच्या हिश्यास फेरफार नोंदीत दाखवला तसेच त्यानुसार प्रत्यक्षात ताबे वहीवाट देखील केली. मात्र प्रत्यक्षात खातेफोड व त्यानुसार ७/१२ उतारे तयार करतांना गट नं. ५/१ म्हणजे ५/अ चा ७/१२ किसन दशरथ पाटील या आणि गट नं. ५/२ म्हणजे ५/ब चा ७/१२ बाजीराव दशरथ पाटील या नावाने दाखविल्याचे दिसते. सदर बाब आमचे अशिलाचे निदर्शनास आल्यानंतर त्याने किसन दशरथ पाटील यांचे निदर्शनास आणून देवून त्या अनुषंगाने अधिकार अभिलेख दुरुस्त करण्यास सहकार्य करावे म्हणून वेळोवेळी विनंती केली असता किसन दशरथ पाटील हे सहकार्य न करता त्यांचे नावाने ७/१२ उतारा दिसत असल्याचा गैरफायदा घेवून गट नं. ५/१/अ ही शेतजमीन उर्मिला प्रभाकर भामरे हीचे नावाने खरेदीखत नोंदुण देवून हस्तांतरण केल्याचे दाखविले. त्यामुळे आमचे अशिलाने धुळे येथील दिवाणी न्यायालयात नियमीत दिवाणी दावा क्र. ३०९/२०२५ विविध मागण्यांसाठी दाखल केला आहे. सदर परिस्थितीची पूर्ण जाणीव असतांनाही उर्मिला प्रभाकर भामरे काही लोकांशी संगनमत करुन वरील मिळकत पुन्हा हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे दिसून आले आहे. वास्तविक पाहता किसन दशरथ पाटील यांचे नावावर दिसत असलेली व आता उर्मिला प्रभाकर भामरे हीचे नावावर दिसत असलेली शेतजमीन गट नं. ५/१/अ त्यांची नसून आमच्या अशिलाच्या हिश्याची आहे व प्रत्यक्ष ताब्यात देखील आहे. त्याचप्रमाणे मुळ गट नं. ५ पैकी जो भाग किसन दशरथ पाटील यांच्या हिश्यास आहे तो पोट हिस्सा अग्रहक्काने घेण्याचा पूर्ण अधिकार आमचे अशिलालाच होता व आहे.

सबब मौजे नवलाणे ता. जि. धुळे येथील आणि पूर्वी किसन दशरथ पाटील यांच्या नावाने व आता उर्मिला प्रभाकर भामरे हीच्या नावाने ७/१२ उताऱ्यावर दिसत असलेली शेतजमीन गट नं. ५/१/अ क्षेत्र ला. ला. १ हे. ७१ आर. व पो. ख. ३७ आर एकूण २ हे. ०८ आर या मिळकतीबाबत रे. मु. नं. ३०९/२०२५ अन्वये दावा न्यायप्रविष्ठ असल्याने आणि त्यात नमूद केल्यानुसार आमच्या अशिलाचे हक्क व अधिकार असल्याने उर्मिला प्रभाकर भामरे यांच्याशी कोणीही कोणत्याही प्रकारचे तबदिलीचे अगर आर्थिक व्यवहार करु नये. केल्यास ते सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीच्या आधारे त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे दि. २९/०३/२०२६

**अ‍ॅड.संकेत एम.जैन**
निवास : व आफिस : प्लॉट नं. ४७-४८सुविद्याविधी भगामोहन नगर, श्री पद्मप्रभु दिगंबर जैन, मंदिराजवळ, वाखारकर नगरच्या पुढे ४२४००४
मो. ९३७३९९९९९१/९८५०९६४५१२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे येथील कुमारनगर भागातील सि. स.नं. ५८८० चे एकूण क्षेत्र ४७.६५ चौ. मी. (यास ब्लॉक नं. एच-४ रुम नं. १०) यात जुने विटा माती पत्र्याचे संपूर्ण बांधीव घर मिळकत बखळ जागेसह सत्ताप्रकार अ.यासी चतु:सिमा

**पुर्वेस : ब्लॉक नं.एच.४, रुम नं. ९, पश्चिमेस : श्रीचंद दयाराय सिंधी यांचे घर**
**दक्षिणेस : वापर व रस्ता उत्तरेस : खुली जागा**

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **सौ. सोनी राजकुमार बजाज** रा.ब्लॉक नं. एफ/६, रुम नं. ११, कुमार नगर, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्चवरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही,तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. २९/०३/२०२६

**अ‍ॅड. रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.
मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे येथील कुमारनगर भागातील सि. स. नं. ५५३७ (यास ब्लॉक नं. ई-४, रुम नं. ६) चे एकूण क्षेत्र ४४.३० चौ. मी. यात जुनी आरसीसी मधील संपूर्ण बांधीव घर बखळ जागेसह मिळकत. सत्ताप्रकार अ. यासी चतु:सिमा

**पुर्वेस : सि. स.नं. ५५३६, पश्चिमेस : सि.स.नं. ५५३८**
**दक्षिणेस : वापर व रस्ता उत्तरेस : वापर व बोळ रस्ता**

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **सौ. शिमला प्रमोद गाबडा** रा.ब्लॉक नं. ई /४, रुम नं. ६, कुमार नगर, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्चवरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही,तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. २९/०३/२०२६

**अ‍ॅड. रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.
मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस
नि. ७

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्युडि) यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं. ८३/२०२६

**१) मदिना भिकन खाटीक, रा.पाष्टे ता. शिंदखेडा जि.धुळे ...अर्जदार**

॥विरूध्द॥

**कोणीही नाही .... जाबदेणार**

**कै. जाफर जुमा खाटीक (मयत)** (मृत्यू ता. २५/०३/१९८०)
रो.हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे.

ज्याअर्थी मयत कै. जाफर जुमा खाटीक (मयत) हे दि. २५/०३/१९८० रोजी मौजे हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून आता अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार मुलगी एकमेव मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २०/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २०/०३/२०२६

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे | कोर्टाचा शिक्का | **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस
नि. ७

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्यु.डि.) यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं. २४५/२०२६

**१) देवकाबाई गोकुळ पाटील, २) सुमित जयदेव पाटील**
**३) रचना जयदेव पाटील, ...अर्जदार**

॥विरूध्द॥

**कोणीही नाही .... जाबदेणार**

ज्याअर्थी कै. जयदेव गोकुळ पाटील हे दि. २०/०१/२०२६ रोजी व मयत प्रतिभा जयदेव पाटील ह्या दि. २१/०१/२०२६ रोजी मौजे निमझरी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून आता अर्जदार नं. १ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार नं. १ ते ३हेच कै. जयदेव गोकुळ पाटील यांचे कायदेशीर वारस व अर्जदार नं. २ व ३ हे मयत प्रतिभा जयदेव पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २९/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. १०/०३/२०२६

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे | कोर्टाचा शिक्का | **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व हितसंबंधितांना तसेच मिळकतीचे खाजगी दलालांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी मौजे नकाणे येथील गट नं. ३५/२ यांसी क्षेत्रफळ १ हे. ७१ आर. त्यासी आकार रु. ३.५५ पैसे भोगवटादार वर्ग १ (पक्क्या विहिरीतील १/२ हिश्याचे पाणी घेण्याचे हक्कासह) ही शेत जमीन यांसी चतु:सिमा मंजूर नकाशाप्रमाणे आहे.

येणे प्रमाणे मिळकतीबाबत मिळकतीचे मुळ मालक मनोहर भगवानदास अग्रवाल रा. धुळे यांचेशी आमचे पक्षकार यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचा सौदा केला आहे व बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे.

वर नमूद मिळकतीवर नमूद केलेल्या मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टांच, बोजा, खरेदी, विक्री, करार, मदार, हस्तांतरण, हक्क, व हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर इतर हितसंबंध, कोर्ट कचेरी, वहिवाट, असल्यास ही जाहीर सूचना नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. वरील कालावधीत कोणाचीही, कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे समजून आमचे आशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर म्हणजे मुदतीनंतर कोणाचीही. कोणतीही हरकत अगर तक्रार आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे.

प्रस्तुतची जाहीर नोटीस ही आमचे पक्षकारांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरन त्यांचेवतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस देण्यात आली असे.

धुळे दि. २४/०३/२०२६

**अ‍ॅड. निलेश पुरुषोत्तम कुलकर्णी** मो. नं. ९५८८४१३६९२
रा. प्लॉट नं. ५७, सैनिक कॉलनी, नगाव बारी, देवपूर, धुळे

## जाहीर नोटीस
नि. ७

### शिरपूर येथील मे. सिव्हिल जज्ज सो. ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं. २५६/२०२६
नि. नं. ७ चौ. ता. २८/४/२०२६

**१) गुलाब इसहक बागवान, २) वसिन शेख इसहक बागवान**
नं. १ व २ रा. अंबिकानगर, पाण्याच्या टाकीसमोर शिरपूर जि. धुळे
**३) सादिक शेख इसाक उर्फ इसहक बागवान**
रा. घर नं. २४०, किस्मतनगर, हुडको शिरपूर जि. धुळे
**४) शाहीन बी मो. जाकीर बागवान**
रा. ६८, निंबू वाली गल्ली, जोशी पेठ, जळगांव जि. जळगांव **..अर्जदार**

॥विरूध्द॥

**कोणीही नाही .... जाबदेणार**

**१) इसहक अब्दुल बागवान, मृत्यू दि. २५/०५/२०२०**
**२) रईसा बी इसहकबागवान, मृत्यू दि. ०४/०२/२०२०**
**मयताचा पत्ता :** रा. अंबिकानगर, पाण्याच्या टाकीसमोर शिरपूर जि. धुळे **... मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील नामे इसहक अब्दुल बागवान हे दि. २५/०५/२०२० रोजी व अर्जदार नं. १ ते ४ यांची आई नामे रईसा बी इसहक बागवान ह्या दि. ०४/०२/२०२० रोजी मौजे शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसीने तमाम जनतेला कळविणेत येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारां व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अगर दिनांक २८/४/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.मे.दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर शिरपूर जिल्हा धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** दिवाणी न्यायालय,शिरपूर | कोर्टाचा शिक्का | **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय,शिरपूर

## जाहीर नोटीस
नि. ७

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यनी. डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं. २८१/२०२६

**१) मणिबाई गुमान पावरा, २) कोंड्याबाई रमेश पावरा**
**३) रंजीत रमेश पावरा, ४) योगेश रमेश पावरा**
नं. १ ते ४ रा. जोयदा ता. शिरपूर जि. धुळे.
**५) संजय रमेश पावरा (मयत)**
५-अ) सागराबाई संजय पावरा (पहिले लग्नाचे नाव)
सागराबाई जादासिंह रावत (दुसरे लग्नाचे नाव)
ह. मु. रा. १२६, मारसिंगह फलिया खाकरी धवली वरला बडवानी (मध्यप्रदेश)
५-ब) रोशन संजय पावरा ५-क) समीर संजय पावरा
अ.नं. ५-अ ही स्वस:साठी व अ. नं. ५-क ची अ.पा.क. आई म्हणून
नं. ५-ब व ५-क रा. जोयदा ता. शिरपूर **...अर्जदार**

॥विरूध्द॥

**कोणीही नाही .... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार मणिबाई गुमान पाावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे रमेश गुमान पावरा हे दि. ०९/०७/२०१३ रोजी मौजे जोयदा ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की,नामे रमेश गुमान पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २/५/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** दिवाणी न्यायालय,शिरपूर | कोर्टाचा शिक्का | **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय,शिरपूर

## नोटीस-जाहीरनामा
नि. ७

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सो. शिरपूर यांच्या न्यायालयात मृत्यू नोंद होण्यासाठी पेपर नोटीस नमुना**

**श्री. सुरेश नथ्थू शिंपी,** उ. व. ६८, धंदा : मजुरी,
मु. पो. करवंद ता. शिरपूर जि. धुळे. **..अर्जदार**

॥विरूध्द॥

**ग्रामसेवक ग्राम पंचायत करवंद ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी म. तहसिलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्ज नुसार मृत्यू दि. १९८२ रोजी मृत्यू झाल्याबाबत मौजे करवंद ता. शिरपूर जि. धुळे येथे मृत्यू झाले बाबत मृत्यू नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(२)(३) प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस,हितचितंक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकापासून त्यांनी १० दिवसाच्या आत कार्यकारी दंडाधिकारी शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. दि. ०९/०३/२०२६

**अ‍ॅड. अमोल नागोराव चौधरी**
दिवाणी कोर्टासमोर, शिरपूरजि. धुळे
मो. ८२७५७६६८४२

## पान १ वरुन

### रुपाली चाकणकरांना समन्स

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. समन्स बजावले म्हणजे काही आकाश कोसळले नाही. तो चौकशीचा भाग आहे, असे ते म्हणाले. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी, या प्रकरणात रुपाली चाकणकर या कायद्याने सहआरोपी असल्याचा दावा केला आहे. एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना त्या म्हणाल्या, भोंदूबाबा प्रकरणात रुपाली चाकणकर कायद्याने सहआरोपी आहेत. कारण, त्यांचा या प्रकरणात असणारा प्रत्यक्ष हितसंबंध, त्यांनी पोलिसांवर टाकलेला दबाव व त्या स्वत: राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणून त्या ट्रस्टवर होत्या. त्यांचे खरातसोबत अनेक फोटो आहेत.

**थेट अटक करा : रोहिणी खडसे**

दरम्यान, खरात कांड हा खुप मोठा आणि गंभीर विषय आहे. या रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी समन्स न बजावता थेट अटक करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी केली आहे. रोहिणी खडसे यांनी पोस्ट करत म्हटले की, नाशिकच्या खरात कांडमध्ये राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षांना एसआयटीचे समन्स आले असल्याचे कळत आहे. खरात कांड हा खुप मोठा आणि खोल विषय आहे. एकाप्रकारे हे एक रॅकेटच आहे. या रॅकेट पर्दाफाश करण्यासाठी समन्स न बजावता थेट अटक कारवाई प्रशासनाने करायला हवी.आरोपींना पुरावे नष्ट करण्याची कोणतीही संधी मिळू नये, याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी, असेही त्यांनी म्हटले आहे. अशोक खरातने स्थापन केलेल्या शिवनिका संस्थेच्या माध्यमातून अनेक आर्थिक व्यवहार आणि कार्यक्रम पार पडले होते. या संस्थेवर विविध वेळी कार्यरत असलेल्या सर्व आजी-माजी सदस्यांची आता एसआयटीकडून सखोल चौकशी केली जाणार आहे. या सदस्यांना लवकरच चौकशीसाठी पाचारण करण्यात येणार असून संस्थेच्या निधीचा वापर आणि खरातला मिळालेले पाठबळ यावर पोलीस लक्ष केंद्रित करत आहेत. शिवनिका या संस्थेच्या विश्वस्त मंडळात कॅप्टन अशोककुमार एकनाथ खरात, डॉ. जितेंद्र गणपतराव शेळके, सौ. कल्पना अशोककुमार खरात, सौ. रूपाली निलेश चाकणकर, सुभाषराव केशवराव जमे, ललित प्रकाश गोफणे, डॉ. नंदकिशोर तुकाराम काटोरे यांचा समावेश आहे.

### महाराष्ट्रात पहिला मृत्यू

त्यांना सिलेंडर देण्यात आला नाही, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी शिरसाट यांच्या मृत्यूनंतर संताप व्यक्त करताना केला आहे. गॅस एजन्सीकडे वारंवार चकरा मारूनही सिलेंडर मिळत नसल्यामुळे ते सकाळपासून रांगेत उभे होते. दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास त्यांना अचानक चक्कर आली आणि ते खाली कोसळले. उपस्थित नागरिकांनी मदत करण्याचा प्रयतक केला, मात्र तोपर्यंत उशीर झाल्याचे सांगितले जात आहे. शिरसाट यांच्या मृत्यूनंतर वंचित बहुजन आघाडीने राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. ओटीपी मिळाल्यानंतरही नागरिकांना सिलेंडरसाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असेल तर ही व्यवस्था कोणासाठी आहे? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. प्रशासनाच्या नियोजनशून्यतेमुळेच हा मृत्यू झाल्याचा थेट आरोप करण्यात येत आहे. शिरसाट यांच्या निधनानंतर गावात शोककळा पसरली असून आज त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. मात्र या घटनेमुळे गॅस तुटवड्याचा प्रश्न किती गंभीर झाला आहे, हे पुन्हा एकदा समोर आले आहे.

### युरोपीय देशांत नो किंग्स मोहीम

ड्रिग्ससारख्या छोट्या शहरांपर्यंत ही निदर्शने पसरली. आयोजकांच्या मते ५० राज्यांमध्ये तीन हजार शंभराहून अधिक कार्यक्रम झाले. सुमारे ९० लाख लोक त्यात सहभागी झाल्याचा अंदाज आहे. सॅन दिएगो येथे सुमारे चाळीस हजार लोकांनी मोर्चा काढला. आंतरराष्ट्रीयस्तरावर लंडन, पॅरिस आणि रोममध्येही निदर्शने झाली. रोममध्ये हजारो लोकांनी पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्या विरोधात आणि इराणवरील हल्ल्यांच्या निषेधार्थ घोषणाबाजी केली.

**इस्त्रायलमध्येही नो वॉरचे पोस्टर**

या युद्धाचे नेतृत्व करणाऱ्या इस्त्रायलमध्ये सुद्धा इराण युद्ध तात्काळ थांबवण्याच्या मागणीसाठी लाखो लोक रस्त्यावर उतरले. इस्त्रायलची राजधानी तेल अविवमध्ये लाखो लोकांनी सरकारविरोधात नारेबाजी केली. नेतन्याहू यांनी युद्ध थांबवावे. देशात या युद्धाचे परिणाम होत असून महागाई भडकल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. सततच्या युद्धामुळे इस्त्रायलची जनताही विटली आहे. यावेळी आंदोलनात नो वॉरचे पोस्टर झळकले. त्यामुळे इराण युद्ध हे ट्रम्प आणि नेतन्याहू यांनी लादल्याचे या आंदोलनातून समोर येत असल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

### आदिवासी शिक्षकांना तात्काळ न्याय द्या

यवतमाळ, जळगाव, आणि गडचिरोली या जिल्ह्यात ८० टक्के शिक्षकांना कायम नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. मात्र नंदूरबार जिल्ह्यात सदर भरती करतांना प्रमाणे २१४ जागांवर प्रक्रिया करण्यात आली होती त्याच प्रक्रियेमधील गुणवत्ता पात्रता यादीमधील शिफारस पात्र १०३ उमेदवारांना अजून पर्यंत कायम नियुक्त्या मिळाल्या नाही. जो पर्यंत कायम नियुक्त्या मिळत नाही तोपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा पेसा आदिवासी मानधन शिक्षकांकडून देण्यात आला आहे.

सदर निवेदनात जहांगीर वळवी, रमेश वळवी, संजय वसावे, हितेश वळवी, समुवेल गावित, संदीप गावित, दिपक गावित, नितेश वसावे, नितेश पाडवी हिरालाल पाडवी, इंदिरा कोकणी, इंदुमती कोकणी, रजनीशा गावित, आशा बागुल, अनिता पाडवी, उज्ज्वला पाडवी, विद्या पाडवी, नीलिमा वसावे, अश्या १०३ शिक्षकांचा सह्या आहेत. संघटनेमार्फत वेळोवेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी, जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन आपल्या मागण्यासंदर्भात चर्चा केली आहे. राज्यातील अन्य आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये अशा पद्धतीने ऑर्डर देण्यात आलेल्या आहेत मात्र फक्त नंदुरबार चा निर्णय प्रलंबित आहे लवकरात लवकर निर्णय न घेतल्यास मानधन तत्वावरील सर्व शिक्षक जिल्हा परिषद समोर आमरण उपोषणास बसणार असल्याच्या इशारा देण्यात आला आहे.

### नाशिक जिल्हा-कायद्याचा बालेकिल्ला

व ब्लॉक चेनचा वापर आणि भौगोलिक माहिती प्रणाली या सात घटकांवर सहभागी कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले होते. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे करण्यात आले होते. त्यात नाशिक जिल्हा- कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम राबविणाऱ्या नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयाने सर्वाधिक १५६.२५ गुण मिळवून पोलिस आयुक्तालय गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला होता.

नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली पोलीस आयुक्त कार्यालयाने डिजिटल उपक्रम राबविले. नागरिकांशी थेट संवादाचे उपक्रम राबविले. त्यासाठी ई मीट वीथ सीपी, वॉक इन टूर, नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य असे विविध उपक्रम राबविले. यामुळे पोलिस दलाच्या कामकाजात पारदर्शकता, गतिमानता येऊन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला.

### लळींग कुरणाच्या पाणवठ्यांमध्ये पाणी

वनविभागाने कृत्रिम पाणवठे निर्माण करून त्यात पाण्याची सोय केली होती. यंदा उन्हाची तीव्रता लवकर वाढली आणि पाणवठे कोरडे झाले. त्यामुळे वन्य जीवातील माकडांसह काही प्राणी तहान भागविण्यासाठी मानवी वसाहतीकडे येऊ लागले आहेत. कोरड्या पाणवठयांमुळे वन्यजीव कासावीस होत असल्याची बातमी दोन दिवसांपुर्वी आपला महाराष्ट्र मध्ये वृत्त प्रसिध्द झाले होते. त्याची वनविभागाने दखल घेतली. लळींग कुरणातील कोरडे पाणवठे स्वच्छ करून त्यात पाणी भरले. त्यामुळे आता वन्य जीवांना तहान भागविणे शक्य होत आहे. वन विभागाच्या या कामामुळे अनेक वन्यजीव प्रेमींनी समाधान व्यक्त केले.

## पान १ वरुन

### वालंबा खूनप्रकरणी दोघे अटकेत

सदर व्यक्तीचा खून केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांच्या पथकाने शोध घेवून त्या दोघांना ताब्यात घेतले. विचारपूस केली असता मोगराबाई वळवी हीस मयताकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून दोघांनी मिळून कांतीलालभाई वळवी याचा खून केल्याची कबुली दिली. या गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. ही कामगिरी जिल्हा पोलिस अधिक्षक श्रवण दत्त एस, अप्पर पोलिस अधिक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, पोलिस उपनिरीक्षक मुकेश पवार, विकास गुंजाळ, हेकॉ. दादाभाई वाघ, विशाल नागरे, ज्ञानेश्वर पाटील, मोहन ढमढेरे, राजेंद्र काटके यांच्या पथकाने केली आहे.

### वीज तारांच्या शॉर्टसर्किटमुळे आग

ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. महसूल विभाग आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तातडीने या घटनेचा पंचनामा करून संबंधित शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी तऱ्हाडी शिवारातील शेतकऱ्यांनी केली आहे. वारंवार तक्रार करूनही विद्युत तारांकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही जोर धरत आहे.

### रुग्णांसाठी हक्काची रुग्णवाहिका

रोहिदास राठोड, अनिल पाटील, दुर्गेश वैष्णव आणि पप्पू गिरासे उपस्थित होते.शहादा तालुक्याच्या वतीने शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल, ज्येष्ठ नेते सुपडू खेडकर, युवा सेना उप जिल्हा प्रमुख राजरतक बिरारे, हेमंत सूर्यवंशी, गणेश माळी, धनराज जायसवाल आणि लखीचंद जायसवाल यांनी ही रुग्णवाहिका स्वीकारली. यावेळी मनलेश जायसवाल यांनी आ. रघुवंशी यांचे आभार मानले.ही रुग्णवाहिका सेवा गरजू रुग्णांसाठी ना नफा-ना तोटा या तत्त्वावर २४ तास उपलब्ध राहणार आहे. तातडीच्या मदतीसाठी रुग्णांनी शहादा येथील शिवसेना संपर्क कार्यालयाशी किंवा शिवसेना पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.रुग्णवाहिकेच्या सेवेसाठी शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधल्यास तात्काळ सेवा उपलब्ध करून दिली जाईल.

### तापदायक ऊन्हाची तमा न बाळगता..

व्हावी म्हणून देवीला साकडे घालण्यासाठी पायी जातात. सध्या तापमानाचा पारा चाळीस अंशावर गेला आहे. कडाक्याचे ऊन असूनही अनेक जण पायीच गडाकडे निघाले आहेत. डीजे आणि पारंपारिक वाद्ये हाती घेत भाविक पदन्यास करीत देवीचा महिमा गात गडाकडे जात आहेत. काही भाविक कपाळावर टिळा आणि अनवाणी पदयात्रेत सहभागी झाले आहेत. धुळे, शिंदखेडा, शिरपूर, शहादा, नंदुरबार आणि मध्यप्रदेशातील हजारो भाविक पायी निघाले आहेत. भाविकांची सेवा करीत काही दानशूर व्यनती आणि संस्थांनी अन्नदानाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. धुळे शहराच्या दक्षिणेस संजय सोया कंपनी तर्फे आणि सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र शिंदे यांच्या तर्फे भाविकांना भोजन देण्यात येत आहे. या ठिकाणी भाविकांच्या विश्रामाची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच रस्त्यावर ठिकठिकाणी उपवास करणाऱ्या भाविकांसाठी साबुदाणा खिचडी, केळी, टरबूज, सरबत देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पारंपारिक मराठी आणि अहिराणी भाषेतील गीतांचे बोल बोलत आणि पदन्यास करीत अनेक भाविक मार्गस्थ होत आहेत. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी मजल-दरमजल करीत भाविकांचे जथ्ये गडावर पोहचणार आहेत.

### दुचाकी अपघातात पत्नी ठार


जाणाऱ्या दुचाकीवरील दाम्पत्य खाली पडल्याने दोघांच्या डोक्याला व उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. यात पत्नीचा मृत्यू झाला तर पती गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. विजय रामलाल बडगुजर यांनी दि.२७ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, मुंबई-आग्रा महामार्ग क्र.५२ शिरपूर तालुक्यातील सांगवी गावाचे शिवारात लालमाती फाटा येथून फिर्यादी व त्यांची पत्नी सुलभा विजय बडगुजर हे दाम्पत्य दुचाकी क्र.एमपी ०९/व्हीएल-०७०८ घेवून जात असतांना लालमाती फाटा येथे मागुन भरधाव वेगाने दुचाकी क्र. एमएच १८/एएफ-९४६५ ने जोरदार धडक दिल्याने पुढे चालणाऱ्या दुचाकीवरील विजय व सुलभा बडगुजर हे दाम्पत्य रस्त्यावर पडल्याने दोघांच्याही डोक्याला व उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. यात सुलभा बडगुजर यांचा मृत्यू झाला तर विजय बडगुजर हे गंभीर जखमी झाले. या प्रकरणी धडक देणाऱ्या दुचाकीस्वार विरोधात शिरपूर तालुका पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक नियमित घ्या : प्रा.चंद्रकांत डागा

**धुळे, दि.२९- ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक घेण्याची मागणी ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य व ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे राज्य कार्यकारीणी सदस्य प्रा.चंद्रकांत डागा यांनी केली. या मागणीबाबतचे निवेदन विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांना इमेलने व स्पीड पोस्टने पाठवून त्याची प्रत धुळे जिल्हा अधिकारी यांना देण्यात आली.**

निवेदनात म्हटले आहे की, प्रत्येक जिल्हासाठी ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ७ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकाराचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद गठीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. ग्राहक संरक्षण परिषद गठीत करून, त्यात नियुक्त अशासकीय व शासकीय सदस्यांच्या जिल्हाधिकारी जे पदसिद्ध अध्यक्ष असतात त्यांच्या अध्यक्षतेखाली नियमित बैठका व्हावयास हव्या.ग्राहक पंचायत महाराष्ट्रने नुकतीच राज्य अध्यक्ष डॉ.विजय लाड यांच्या अध्यक्षतेखाली व राज्य सचिव अरुण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य कार्यकारिणीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्याच्या ग्राहक संरक्षण परिषदेच्या अशासकीय सदस्यांच्या समन्वयकांची ऑनलाइन आढावा बैठक घेतली. त्यात काही मोजके जिल्हे वगळता, अनेक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठका झालेल्या नाहीत, ज्या ठिकाणी बैठका झाल्या आहेत, त्या ठिकाणी त्या नियमित होत नाही, जिल्हा अधिकारी, शासकीय सदस्य बैठकीला उपस्थित राहत नाही म्हणून ग्राहकांच्या समस्या, ज्या त्वरित सुटल्या पाहिजे त्या सुटत नाही.असे निदर्शनास आले आहे. धुळे जिल्ह्यातही पूर्ण वर्षात केवळ दोन बैठका झाल्या आहेत. या दोन्ही बैठकांना जिल्हा अधिकारी उपस्थित नव्हते तर दुसऱ्या बैठकीला जिल्हा पुरवठा अधिकारीही नव्हते. सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली केवळ दोन तीन शासकीय सदस्यांच्या उपस्थित ही बैठक झाली. पहिली बैठक ही २५ मार्च २०२५ व दुसरी ९/१०/२०२५ रोजी झाली आहे. तरी ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक घ्यावी व त्यापुढे या बैठका नियमित होतील अशी मागणी करत आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचा आ.अमरिशभाई पटेल, आ.पावरा यांनी घेतला लाभ



**शिरपूर, दि.२९- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' १३२ व्या भाग कार्यक्रमाच्या माध्यमातून रविवारी २९ मार्च रोजी देशवासियांशी संवाद साधला. या लोकप्रिय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शिरपूर शहरातील जनक व्हीला येथे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आले.**

माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.यावेळी आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा व पदाधिकारी यांनी पंतप्रधानांच्या मार्गदर्शनपर संदेशाचे श्रवण केले. मन की बातच्या माध्यमातून पंतप्रधानांनी देशातील सकारात्मक घडामोडी, स्वच्छ भारत अभियान, आत्मनिर्भर भारत, स्थानिक उत्पादनांचा वापर, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

शिरपूर येथील 'जनक व्हीला' येथे माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी जि. प. उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, भाजपा ग्रामीण अध्यक्ष भरत पाटील, सांगवी मंडळ अध्यक्ष योगेश बादल, माजी पं. स. सभापती गिलदार पावरा, गोविंदा पावरा (जोयदा), भाजपा चिटणीस संजय जाधव, पदाधिकारी यांनी 'मन की बात' कार्यक्रम श्रवण केला.

कार्यक्रमानंतर उपस्थितांनी पंतप्रधानांच्या संदेशातील विचार आपल्या दैनंदिन जीवनात अमलात आणण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच सामाजिक उपक्रम, स्वच्छता मोहिमा व पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन शिरपूर शहरासह तालुक्याच्या विकासात हातभार लावण्याचा संकल्प करण्यात आला.आ.अमरिशभाई पटेल यांनी यावेळी सांगितले की, पंतप्रधानांचा मन की बात कार्यक्रम हा केवळ संवाद नसून तो देशातील प्रत्येक नागरिकाला राष्ट्रनिर्माणात सहभागी होण्याची प्रेरणा देणारा उपक्रम आहे. समाजातील चांगल्या कामांना प्रोत्साहन देणे व सकारात्मक विचारांची देवाण-घेवाण करणे ही या कार्यक्रमाची मोठी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी नागरिकांनी स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प करावा, असेही आवाहन केले. या उपक्रमामुळे शिरपूर परिसरात राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ झाली असून नागरिकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### महावीर जयंतीला मांस विक्री बंद ठेवण्याची मागणी

धुळे, दि.२९- जैन धर्मियांचे चौवीसवे तीर्थंकर भगवान महावीर यांचा ३१ मार्च रोजी जन्म कल्याणक दिवस असून या दिवशी शिंदखेडा शहरातील कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद ठेवावी अशी मागणी जैन श्री संघाने केली आहे.यामागणी बाबतचे निवेदन नायब तहसीलदार (महसूल) विजय गोस्वामी, शिंदखेडा पोलीस स्टेशनचे एपीआय अनंत पवार, नगर पंचायत आरोग्य विभागचे राजेंद्र चौधरी यांना दिले. निवेदनात म्हटले आहे की, भगवान महावीरांच्या जन्म कल्याणक दिवशी, जैन धर्मीय विशेष धर्म आराधना करतात. या दिवशी भगवान महावीरांच्या जिवन चरित्रावर व्याख्यान, त्यांनी साडे बारा वर्ष केलेली घोर तपस्या, यात येणारे परिषह व केवल ज्ञान प्राप्त झाल्यावर केलेले उपदेश यावर विशेष प्रकाश झोत टाकला जातो. या दिवशी जैन धर्मीय सामायिक, संवर, पौषध, उपवास आदी विशेष तपही करतात. या दिवशी शहरातील कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे निवेदन श्री जैन संघ अध्यक्ष सज्जनराज कवाड, सचिव राकेश कर्नावट, बीजेएसचे विभाग अध्यक्ष प्रा.चंद्रकांत डागा, सचिव अशोक राखेचा, शहर अध्यक्ष मयूर ओस्तवाल, सचिव लखिचंद बोथरा, माजी स्वीकृत नगरसेवक सुमित जैन,मनीष बोथरा, केतन पारख आदींनी दिले.

**हॉल भाड्याने/ कराराने देणे**
कार्यालय, कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, अभ्यासिका, इन्शूरन्स कंपनी इ.साठी १३०० स्क्वे.फूटचा हॉल भाडे किंवा कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
9421413721

**त्वरित भरती!**
KOMAL ELECTRONICS
रिक्त पदे
* SAMSUNG SHOWROOM साठी सेल्स एक्झिक्युटिव्ह (Sales Executive) : ४ पदे अनुभवास प्राधान्य
* मदतनीस (OFFICE BOY) : २ पदे
* कॉम्प्युटर ऑपरेटर : १ पद (Tally चे ज्ञान असणे अनिवार्य)
* पात्रता : १२ वी, BA, BSC, DIPLOMA असणारे उमेदवार.
(RESUME+ID CARD सोबत आणणे)
SALARY TO 15,000+Incentive
KOMAL ELECTRONICS
ठिकाण : महानगरपालिका कॉम्प्लेक्स, झांसी राणी चौक, धुळे
मोबाईल : 7422021111

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

**पाहिजेत**
रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/ हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिल्या जातील.
अपोलो गारमेन्ट
गरुड मैदान कॉम्प्लेक्स, साक्रीरोड, धुळे
7498748799

**पाहिजेत**
१) ऑफिस कामासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. फ्रेशर पण चालेल.
२) Photoshop कामासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. फ्रेशर+अनुभवी असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
मुंबई आग्रा हायवेजवळ, रामनगर, धुळे
7666176855

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट मानस अपार्टमेंट, फ्लॅट नं.८, गणेश नगर, नेताजी ग्राऊंड जवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
8459179969
9420080697

**पाहिजे**
घरकामासाठी गरजू महिला पाहिजे. प्रत्यक्षच भेटण्याची वेळ सकाळी ९ ते १
पत्ता : सौमित्र बंगला, हॉटेल चूल आंगनच्या मागे, देवपूर, धुळे
रविंद्र शेलकर
9422285381

**पाहिजे**
झेरॉक्स व कॉम्प्युटर ऑनलाईन कामे करण्यासाठी मुलगा पाहिजे.
स्वामी मल्टी सर्व्हिसेस
छ.शिवाजी महाराज व्यापारी संकुल, मनोहर सिनेमा जवळ, आग्रारोड, धुळे
7776935111

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**शेतकरी माल खरेदी**
शेतकरी गहू, मका, ज्वारी व इतर शेतकरी माल कोणत्याही खर्चाशिवाय MIDC धुळे येथे खरेदी सुरु आहे.
-: संपर्क :-
9403453061
9673942025


**भाड्याने देणे आहे**
१३ बाय ७० अरूंद असा हॉल फायनान्स अथवा गोडाऊनसाठी भाडेतत्वावर देणे आहे.
पत्ता : गल्ली नंबर ७ पारोळा रोड पंजाब नॅशनल बँकेच्या मागे धुळे.
अमोल गोरे
+91 95953 63630

**फ्लॅट भाड्याने देणे**
टू बी एचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. नंदाई अपार्टमेंन्टस् फ्लॅट नं.६६, नेहरु हौसिंग सोसायटी, नवरंग पाण्याच्या टाकीजवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9423979671
9730782843

**पाहिजेत**
एमआयडीसी येथे फॅक्टरीसाठी सुपरवायझर, अकौन्टंट, कामगार पाहिजेत.
-: संपर्क :-
9130397130

**पाहिजेत**
हॉटेल साफसफाई साठी माणूस व रात्री साठी वॉचमन पाहिजे. अनुभव असल्यास प्राधान्य
-: संपर्क :-
हॉटेल ब्लिस कॉन्टी,धुळे
9527266999

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic Godrej
COOLS AT 52°C
Dual Inverter COMPRESSOR
R32 REFRIGERANT




2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर*
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.*
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
नियम आणि अट लागू
श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०